महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक: १४४२(२)(२)/२०१९/२३ दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१

# -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:- महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा २०१९ (पोलीस उपनिरीक्षक) कोल्हापूर केंद्रावरील शारीरिक चाचणी व मुलाखती पुढे ढकलण्याबाबत.**

संदर्भ:- (१) जाहिरात क्रमांक ०१/२०१९व अधिसूचना क्र. ०८/२०१९.
(२) आयोगाचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२१ रोजीचे प्रसिध्दीपत्रक.
(३) आयोगाचे दिनांक २१ ऑक्टोबर, २०२१ रोजीचे प्रसिध्दीपत्रक.

महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा २०१९-(पोलीस उपनिरीक्षक) च्या लेखी परीक्षेच्या दिनांक ३ ऑगस्ट, २०२१ रोजी जाहीर करण्यात आलेल्या सुधारित निकालाच्याआधारे शारीरिक चाचणीकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांचा प्रथम टप्प्यातील कोल्हापूर, पुणे व नाशिक या केंद्रावरील शारीरिक चाचणी व मुलाखतीचा कार्यक्रम संदर्भित दिनांक २१ ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या परिपत्रकान्वये प्रसिध्द करण्यात आला आहे. तथापि, कोल्हापूर केंद्रावर झालेल्या अवकाळी पावसामुळे दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ ते दिनांक १९ नोव्हेंबर, २०२१ या कालावधीतील ०३ दिवसांचा शारीरिक चाचणी व मुलाखतीचा कार्यक्रम पुढे ढकलण्यात येत आहे. सदर कालावधीतील उमेदवारांचा शारीरिक चाचणी व मुलाखतीचा सुधारित कार्यक्रम स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येत आहे.

**२.** प्रस्तुत केंद्रावरील उर्वरित दिनांक २२ ते २५ नोव्हेंबर, २०२१ व २९ नोव्हेंबर, २०२१ ते दिनांक ०२ डिसेंबर, २०२१ या कालावधीतील शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या कार्यक्रमात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

ठिकाण- मुंबई

उपसचिव, परीक्षोत्तर(अ.प.)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग